ePaper
| वर्ष - 7 | अंक - 160 | UDYAM-MH-26-0158827 |
महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 16 ऑक्टोंबर 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# एकनाथ शिंदेंचा राज ठाकरेंना धक्का; कल्याणमध्ये मनसेला मोठं खिंडार



## आतील पानांत

- अफगाणिस्तानसमोर इंग्लंडचे लोटांगण!
- दिल्लीत भूकंपाचे जोरदार धक्के!
- चंद्रकांत पाटलांवर शाईफेक!
- गर्दी मराठा समाजाला नवीन नाही!

# चंद्रशेखर बावनकुळेंनी फटकारले अन् 'रामायण' घडले!

## » इनसाईड स्टोरी : भाजपामध्ये शंकर जगतापांविरोधात 'कट कारस्थाने'

।पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड भाजपाची धुरा शंकर जगताप यांच्या हातात आली आणि चिंचवड विधानसभा मतदार संघातील अनेक अतिमहत्त्वाकांक्षी नेत्यांची राजकीय गणिते चुकली. त्यामुळे २०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी जगताप कुटुंबाला राजकीयदृष्ट्या उद्ध्वस्थ करण्याचे कट-कारस्थान रचले जात आहे. परिणामी, जगताप कुटुंबासाठी सध्याचा काळ कसोटीचा आहे.**



चिंचवडचे दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांनी चिंचवड मतदार संघात २० वर्षे निर्विवाद सत्ता राखली. आजारपणामुळे त्यांचे निधन झाले. तत्पूर्वीच त्यांनी 'विधानसभा निवडणूक प्रमुख' म्हणून शंकर जगताप यांना मतदार संघात सक्रीय केले. पक्षाच्या बैठका, राजकीय निर्णय आणि विकासकामांबाबत शंकर यांचा शब्द अंतिम होता. त्यामुळे शंकर भविष्यातील स्पर्धक होणार ही भिती काही महत्त्वाकांक्षी लोकांना सतावत होती. या राजकीय असुरक्षेतूनच लक्ष्मण जगताप यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू असतानाही शंकर जगताप यांची 'राजकीय कोंडी' कशी करता येईल? याची रणनिती आखली जात होती. लक्ष्मण जगताप यांच्या निधनानंतर जानेवारी- २०२३ मध्ये पोटनिवडणूक जाहीर झाली. त्यावेळीच दिवंगत जगताप यांचा राजकीय वारसदार कोण? असा विचार हेतुपरस्सर पुढे आणण्यात आला. वास्तविक, शंकर जगताप यांना निवडणूक प्रमुख करुन आणि निर्णय स्वातंत्र्य देवून दिवंगत जगताप यांनी शंकर यांच्याच खांद्यावर धुरा दिली होती. मात्र, "भाजपाची उमेदवारी कोणाला? पत्नी अश्विनी जगताप की बंधू शंकर जगताप यांना" असे दोन परस्परविरोधी मतप्रवाह जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आले.

"राजा का बेटा राजा नाहीं बनेंगा..." ही राजकीय पुडीही सोडण्यात आली. त्यावर प्रसारमाध्यमांमध्ये नियोजनबद्ध चर्चा घडवून आणण्यात आली. "अश्विनीताई उमेदवार असतील... तर आम्ही निवडणूक लढवणार नाही..." असे जाहीरपणे सांगणारे नेते निवडणुकीच्या रिंगणात उतरले आणि लढलेसुद्धा. नियोजनाप्रमाणे शंकर जगताप यांच्या उमेदवारीचा पत्ता कट झाला. हा शंकर जगताप यांच्यासह जगताप कुटुंबियांविरोधातील सामूहिक कट- कारस्थानाचा पहिला विजय होता. ही निवडणूक जगताप कुटुंबियांसाठी निश्चितच सोपी नव्हती. कारण, दिवंगत जगताप यांच्या मृत्यूमुळे असलेल्या सहानुभूतीचे वातावरण संपवण्यात पक्षांतर्गत आणि पक्षाबाहेरील विरोधक यशस्वी झाले होते.

(उर्वरित पान 2 वर)

**»वादग्रस्त पत्रकार परिषदेतील वस्तुस्थिती आणि षडयंत्र वाचा उद्याच्या अंकात**



## शंकर जगताप न लढता जिंकले...

» शहर आणि राज्य पातळीवर अनेक राजकीय खलबतांनंतर भाजपाने अश्विनी जगताप यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब केले. निवडणुकीची जबाबदारी शंकर जगताप यांच्यावर सोपवली. राज्यातील तत्कालीन राजकीय परिस्थिती पाहता कसबा निवडणुकीत भाजपाला जागा गमवावी लागली. तीच परिस्थिती चिंचवडमध्ये झाली असती, कारण उमेदवारीची घोषणा करण्यापूर्वी पुणे-मुंबई वारी करणाऱ्या अनेक महत्त्वाकांक्षी नेत्यांनी निवडणूक प्रचारात तटस्थ भूमिका घेतली. 'सीट काढायची आहे' म्हणून जगताप कुटुंबियांनी जुळवून घेतले. शंकर जगताप यांनी निवडणूक प्रतिष्ठेची केली आणि जिंकण्यासाठी प्रचंड मेहनत घेतली. निवडणुकीच्या निकालानंतर अनेकांचे चेहरे उघडे पडले. ज्यांनी शंकर जगताप यांच्या उमेदवारीला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष विरोध केला. त्यांच्याच प्रभागांमध्ये अश्विनी जगताप यांना मतदान कमी आहे. ही निवडणूक शंकर जगताप यांनी न लढता जिंकली होती, ही वस्तुस्थिती आहे.

# शिवसेना शिंदे गटात 'इन्कमिंग' सुरूच!

## » सांगवीतील शेकडो कार्यकर्त्यांचा खा. श्रीरंग बारणे यांच्या मार्गदर्शनाने प्रवेश

। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**खासदार श्रीरंग बारणे यांच्या मार्गदर्शनानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेशाचा धडाका सुरूच आहे. सांगवी येथील शेकडो कार्यकर्त्यांनी पक्षात प्रवेश केला.**

प्रशांत कडलग यांच्या कार्यालयात शिवसेना पक्ष आढावा बैठक उत्साहात पार पडली. या वेळी हा पक्ष प्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. या बैठकीवेळी पक्षाची जबाबदारीची पदे देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तसेच शिवदूत, बूथ प्रमुख नेमण्यात येणार आहे.

या वेळी प्रशांत कडलग, रवींद्र ब्रम्हे, ऍड. प्रवीण गायकवाड, पोर्णिमा आमराव, शिल्पा देशमाने, प्रवीण खडसे, राजेश बोचरे आदीसह मान्यवर उपस्थित होते. पक्षात प्रवेश करणाऱ्यांमध्ये अविष्कार मोरे, वेदांत नांदगावकर, हर्षल आवरी, सुजल पाटील, दर्शन भगत, आदर्श मोलावडे, प्रणव रोकडे, रजत दळवी, झैद शेख, क्रिश पाटील, तन्मय निकाळजे आदीसह ज्येष्ठ महिला व पुरुष नागरिकांनी शिवसेनेत प्रवेश केला.



(पान1 वरून)

## जगताप विरोधकांचा पहिला पराभव...

चिंचवडच्या पोटनिवडणुकीत शंकर जगताप यांनी आपली क्षमता सिद्ध केली. दरम्यान, भाजपाचे पूर्व शहराध्यक्ष आणि आमदार महेश लांडगे यांचा शहराध्यक्षपदाचा कार्यकाळ संपला. त्यामुळे नवा शहराध्यक्ष कोण? अशी चर्चा जोर धरू लागली. पुन्हा जगताप विरोधी फळी जागी झाली. “एकाच घरात दोन पदे नको..”, “पक्षात दुफळी माजली जाईल...”अशी वातावरण निर्मिती सुरू झाली. प्रसारमाध्यमांमध्ये नियोजनबद्ध चर्चा घडवून आणण्यात आली. ज्या नेत्यांनी पोटनिवडणुकीत शंकर जगताप यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. त्याच नेत्यांनी शहराध्यक्षपदासाठीही विरोधाची धार कायम ठेवली. मात्र, आगामी लोकसभा, विधानसभा आणि महापालिका निवडणुकांमध्ये भाजपाची ताकद कायम ठेवायची असेल, तर “मॅन, मसल आणि मनी” अशी तिहेरी ‘पॉवर’ असलेला तगडा नेता भाजपाला शहराध्यक्ष म्हणून हवा आहे. त्यासाठी शंकर जगताप यांच्याशिवाय पर्याय नाही. कारण, दिवंगत लक्ष्मण जगताप, आमदार महेश लांडगे ही एक शहराध्यक्षपदाची ‘ पॉलिटीकल लीगसी’ ठरली आहे. ती कायम ठेवता आली पाहिजे. लक्ष्मण जगताप यांनी राष्ट्रवादीशी दोन हात केले आणि भाजपाकडे सत्ता मिळवली. महेश लांडगे यांनी पक्ष विरोधात असतानाही शहराध्यक्ष म्हणून नेटाने कारभार केला. आता त्यांच्यानंतर सक्षम नेता शंकर जगताप आहे, असा ‘रिपोर्ट’ भाजपाच्या गुप्तचर यंत्रणेने पक्षनेतृत्त्वाला पोहोचवला. परिणामी, शहर कार्यकारिणी जाहीर करताना प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी शंकर जगताप यांना शहराध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. हा जगताप विरोधकांचा पहिला पराभव ठरला.

## शिव महापुराण कथा सोहळ्यामुळे अनेकांच्या पोटात गोळा...

शहराध्यक्ष पदाच्या निवडीवरून शहर भाजपात दुफळी माजवण्यात आली. पक्षनेतृत्त्वाकडे तक्रारी, निवेदने आणि बैठका झाल्या. मात्र, चंद्रशेखर बावनकुळे यांनी ‘किसी की एक ना सुनी’. शंकर जगताप यांचा विरोध करणाऱ्यांची अस्वस्थता कमालीची वाढली. प्रसारमाध्यमांमध्ये पुन्हा त्या चर्चा घडवून आणण्यात आल्या. शहराध्यक्ष झाल्यानंतर शंकर जगताप यांनी पहिलाच सार्वजनिक कार्यक्रम घेतला. मध्यप्रदेश येथील प्रसिद्ध शिव महापुराण कथा वाचक प्रदीप मिश्रा यांचा “अष्टविनायक शिव महापुराण कथा वाचन सोहळा” सांगवी येथील पीडब्यूडी मैदानावर झाला. सात दिवस झालेल्या या सोहळ्याला सुमारे १८ लाखांहून भाविकांनी गर्दी केली. राज्यातील अध्यात्मिक क्षेत्रात हा सोहळा ‘रेकॉर्ड ब्रेक’ ठरला. महाराष्ट्रातील सर्वात मोठा शिव महापुराण कथा सोहळा म्हणून पुणे जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात या कार्यक्रमाची चर्चा झाली. देव-देश आणि धर्म याबाबत कमालीची संवेदनशीलता असलेल्या भाजपाच्या गुप्तचर यंत्रणेची नजर या कार्यक्रमावर होती. अपेक्षेप्रमाणे सर्व ‘रिपोर्टिंग’ पक्षनेतृत्त्वाकडे झाले. शंकर जगताप यांची ‘लाईन ऑफ अ‍ॅक्शन’ योग्य आहे, ही बाब अधोरेखित झाली. त्यामुळे २०२४ साठी इच्छुक असलेल्या महत्त्वाकांक्षी नेत्यांच्या पोटात गोळा आला होता. त्यानंतर शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये जगताप यांनी ‘अल्पसंतुष्टांना दोन हात लांब’ ठेवण्याचा धाडसी निर्णय घेतला आणि भाजपाला संघटनात्मक बळ देण्यासाठी तयारी सुरू केली. “संघटनेत एकही पद नाही, पक्षश्रेष्ठींकडे दाद मिळत नाही...” अशी स्थिती झाल्यामुळे शंकर जगताप विरोधी गट आणखी सक्रीय झाला.

## आगामी काळ जगताप कुटुंबियांसाठी कसोटीचा...

“महत्त्वाच्या पदाअभावी संघटनेत बोलता येईना. शंकर जगताप यांना विरोध करता येईना...” अशी अडचण झाल्यामुळे पुन्हा अल्पसंतुष्ट नेत्यांनी आमदार अश्विनी जगताप यांना ‘ढाल’ करायला सुरूवात केली. पक्ष संघटनेच्या कार्यक्रमातील उणीवा काढणे आणि किरकोळ बाबींचा ‘इश्यू’ करीत आमदार जगताप यांना डावलले जाते आहे, अशी वातावरण निर्मिती सुरू झाली. “संघटना कामच करीत नाही. पक्षाचे निरोपच मिळत नाहीत. आम्ही काम काय करायचे आणि कसे करायचे काहीच सांगितले जात नाही. आम्हाला डावलले जाते...” अशी अनेक तक्रारींची जंत्री निर्माण करण्यात आली आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या ‘कानाला लागली’. पण, भाजपा पक्षश्रेष्ठी निर्णय घेतात तो त्यांच्या त्रयस्थ गुप्तचर यंत्रणेच्या ‘रिपोर्ट’नुसार आणि शंकर जगताप यांचा ‘रिपोर्ट’ चुकीचा नाही. किंबहुना, ओबीसी समाजाला पक्ष संघटनेमध्ये सर्वाधिक संधी दिल्याबद्दल स्वत: बावनकुळे समाधानी आहेत, अशी स्थिती आहे. ‘घर चलो अभियान’च्या निमित्ताने बावनुकुळे यांनी पिंपरी-चिंचवडचा दौरा केला. या दौऱ्याचे शंकर जगताप यांनी शहराध्यक्ष या नात्याचे अचूक नियोजन केले. मात्र, जगताप यांना अपयशी ठरवण्यासाठी अल्पसंतुष्ट नेत्यांची यंत्रणा कामाला लागली. परिणामी, दौऱ्याची माहिती देण्यासाठी आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेपासून कार्यक्रम स्थळापर्यंत जिथे संधी मिळेल, तिथे वादंग निर्माण करण्याचे ‘कारस्थान’ रचण्यात आले होते. विशेष म्हणजे, बावनकुळे यांच्या ताफ्याला काळे झेंडे दाखवण्याचीची तयारी होती, असे समजले. दुसरीकडे, २०२४ साठी इच्छुक असलेल्या एका नेत्याने बावनकुळे उतरलेल्या हॉटेलमध्ये धडक दिली. त्याठिकाणी शंकर जगताप यांच्याविरोधात तक्रारींचा पाढा वाचायला सुरूवात केली. पण, ‘रिपोर्ट’ चांगले असल्यामुळे बावनकुळे यांनी शंकर जगताप यांची पाठराखण केली. किंबहुना, “तुम्ही मला काही सांगू नका. आधी पक्षाचे काम करा...” अशा शब्दांत संबंधित नेत्याला फटकारले. त्यामुळेच पुढे ‘वॉरिअर्स संवाद’ कार्यक्रमात क्षुल्लक कारणावरुन राडा नाट्य करुन ‘रामायण घडले’. या सर्व घडामोडींमध्ये जगताप कुटुंब केंद्र स्थानी राहिले आहे. त्यामुळे आगामी काळ हा जगताप कुटुंबियांसाठी कसोटीचा ठरणार आहे.

# पुण्यात कारभारी बरेच बदललेत!

## पुण्यात काम करावे लागेल : सुप्रिया सुळे

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**"राष्ट्रवादी कॉंग्रेसचे दोनच नेते पुण्यात लक्ष घालत होते, त्यामुळे मी खडकवासला सोडून कधी पुण्यात लक्ष घातले नाही. आता इथे बरेच कारभारी बदलले आहेत, त्यामुळे मलाही आता पुण्यात काम करावे लागेल. आज संघर्ष माझ्या वाट्याला आला आहे, त्यावर मात केल्याशिवाय राहणार नाही'.**



अशा शब्दात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षा सुप्रिया सुळे यांनी रविवारी पुण्याच्या राजकारणात सक्रिय होणार असल्याचा थेट संकेत दिला. पुणे नवरात्र महोत्सवाचे उद्घाटन सुळे यांच्या हस्ते रविवारी गणेश कला क्रीडा मंच येथे झाले. यावेळी आमदार रवींद्र धंगेकर, पोलिस सहआयुक्त संदीप कर्णिक, माजी आमदार उल्हास पवार, कॉंग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे (शरद पवार गट) शहराध्यक्ष प्रशांत जगताप, कॉंग्रेसचे नेते मोहन जोशी,

रमेश बागवे, बाळासाहेब शिवरकर, महोत्सवाचे अध्यक्ष आबा बागूल, जयश्री बागूल आदी उपस्थित होते. उद्योजक डॉ.संजय मालपाणी, भारती हॉस्पिटलच्या कार्यकारी संचालिका डॉ.अस्मिता जगताप, वन्यजीव छायाचित्रकार स्वागत थोरात, लोककलावंत डॉ. गणेश चंदनशिवे, लावणी कलाकार रूपाली व दीपाली जाधव परभणीकर यांना "श्री लक्ष्मीमाता जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला. तसेच सामाजिक कार्यकर्ते शिरीष बोधनी यांचाही सत्कार करण्यात आला. "नगरसेवक नसल्याने माझीही अडचण होत आहे. सरकारने सर्वेक्षण बघायचे सोडून, महापालिका निवडणूका अगोदर घ्याव्यात' अशी मागणी सुळे यांनी केली. त्या म्हणाल्या, ""शहाण्याने कोर्टाची पायरी चढू नये, असे म्हणतात, पण मी पहिल्यांदाच थेट सर्वोच्च न्यायालयाची पायरी चढले. तेव्हा शिवसेना व राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष माझ्या खांद्याला खांदा लावून साथ देत होते.

तर कॉंग्रेसचे मातब्बर वकील माझ्या पाठीशी होते.त्यानंतर सलग तीन दिवस देशात कॉंग्रेसच्या नेत्यांसमवेत बैठकांना जात आहे. त्यामुळे नियतीच्या मनात महाविकास आघाडीबाबत काहीतरी चांगले होणार असल्याचे स्पष्ट होत आहे. भाजपला राजकीय व धोरणात्मक विरोध असतानाही आम्ही महिला आरक्षणासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहिलो. मात्र त्यांनी महिला आरक्षण विधेयक मांडताना त्यावर नावे, सह्या घेतल्या पण तारीख न टाकून मोठी जुमलेबाजी केली. त्यामुळे महिला आरक्षण पास होण्याची शक्यता नाही. "इंडिया"चे सरकार येईल, तेव्हाच आम्ही महिला आरक्षण विधेयक आणू, असेही त्यांनी सांगितले. मी मीरा बोरवणकर यांचे पुस्तक काही वाचलेले नाही, आरोप करणारे लेखक आहेत. त्यामुळे त्याच त्याविषयी अधिक स्पष्टीकरण देऊ शकतील.

### आम्ही महिला आरक्षण विधेयक आणू

» भाजपला राजकीय व धोरणात्मक विरोध असतानाही आम्ही महिला आरक्षणासाठी त्यांच्या पाठीशी उभे राहिलो. मात्र त्यांनी महिला आरक्षण विधेयक मांडताना त्यावर नावे, सह्या घेतल्या पण तारीख न टाकून मोठी जुमलेबाजी केली. त्यामुळे महिला आरक्षण पास होण्याची शक्यता नाही. "इंडिया"चे सरकार येईल, तेव्हाच आम्ही महिला आरक्षण विधेयक आणू, असेही त्यांनी सांगितले.

# बस चालकांच्या संपानंतरही बस धावणार!

## 450 चालकांना ई-बस चालवण्याचे प्रशिक्षण

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपी) त्यांच्या चालकांना ई-बस चालविण्यास प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. आतापर्यंत साडेचारशे चालकांनी ई-बस चालविण्याचे प्रशिक्षण पूर्ण केले आहे. त्यामुळे आता भविष्यात ई-बस चालकांनी संप केला तरी पीएमपीचे संचलन सुरळितपणे सुरू राहणार आहे असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.**




पुणे महानगर परिवहन महामंडळाच्या ताफ्यात एकूण दोन हजार ८९ बस आहेत. त्यामध्ये ९९१ बस या पीएमपीच्या मालकीच्या आहेत. तर, एक हजार ९८ बस या ठेकेदारांच्या आहेत. यातील ६४० बस या सीएनजीवरील आहेत. तर, ४५८ ई-बस आहेत. २५ ऑगस्टला ई-बसवरील काही चालकांनी आचानक संप पुकारला होता. त्यावेळी पीएमपी प्रशासनाची चांगलीच धावपळ उडाली होती. पीएमपीच्या ई-बसमधील नवीन तंत्रज्ञानामुळे त्या बस चालविण्यास अडचणी आल्या होत्या. त्यामुळे पीएमपीचे अध्यक्ष सचिंद्र प्रताप सिंह यांनी पीएमपीच्या चालकांना ई-बसचे प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला.

> “ ई-बस दुरूस्तीसाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. बसची काहीही समस्या आल्यावर थेट कंपनीच्या अभियंत्यांना बोलवावे लागते. अशा परिस्थितीत पीएमपीकडील गॅरेजमधील कर्मचाऱ्यांना ई-बसची दुरुस्ती करता यावी यासाठी प्रशिक्षण देण्यात येणार आहे, असे पीएमपी प्रशासनाकडून सांगण्यात आले. ई-बसच्या चालकांना प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली आहे. आतापर्यंत साडेचारशे बस चालकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. इतरही चालकांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे.
>
> -डॉ. सचिंद्र प्रताप सिंह अध्यक्ष, पीएमपी

# बेजबाबदार बिल्डरांविरोधात ‘एल्गार’!

## सोसायटीधारक आवाज उठवणार : सहविचार सभेत एकमत झाला निर्णय

**। पिंपरी ।महाईन्यूज ।**

**पिंपरी-चिंचवड शहरातील बरेच बांधकाम व्यवसायिक नियमाचे उल्लंघन करत आहेत. नियमबाह्य बेधडक बांधकाम करत आहेत. त्याला पिंपरी चिंचवड महापालिकेचे प्रशासन पाठीशी घालत आहे. याबाबत तीव्र स्वरूपाचा आवाज उठविण्याचे एकमत सोसायटीधारकांनी मांडले.**



चिखली-मोशी-पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशनच्या वतीने सोसायटीधारकांच्या समस्या सोडविण्यासाठी सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला फेडरेशनचे अध्यक्ष संजीवन सांगळे, कायदे विषयक सल्लागार अजित बोराडे, आदीसह परिसरातील 2 हजार सोसायट्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या सभेमध्ये पिंपरी चिंचवड शहरातील सोसायटीधारकांच्या विविध समस्येवर चर्चा करण्यात आली. यामध्ये बांधकाम व्यवसायिकाकडून सोसायटी धारकांची होणारी पिळवणूक तसेच बांधकाम व्यवसायिकाकडून प्रलंबित कामाबाबत चर्चा करण्यात आली.

या सभेमध्ये फेडरेशनचे कायदेविषयक सल्लागार अजित बोराडे यांनी आदर्श उपविधीनुसार सोसायटी कशी चालवायची, याबद्दल मार्गदर्शन केले. सोसायटी विकसकाकडून हस्तांतरण करून घेत असताना काय काळजी घेतली पाहिजे, कोणती कागदपत्रे घ्यावीत, याबाबत मार्गदर्शन केले. तसेच कन्व्हेन्स डीड, डीन्म्ड कन्व्हेन्स याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. गणेश वाघमारे यांनी सोसायटीची पूर्ण निवडणूक प्रक्रिया सर्व सभासदांना समजावून सांगितली

या सभेमध्ये रवींद्र आंबेकर, मारुती परीट यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन दीपक निकम यांनी केले. आभार बाळासाहेब पाटील यांनी मानले.

### सोसायटी फेडरेशनने मांडला कार्याचा आढावा...

फेडरेशनने मागील 8 वर्षापासून केलेल्या कार्याचा आढावा अध्यक्ष संजीवन सांगळे यांनी सादर केला. फेडरेशनने प्रदूषणाच्या विषयावर केलेले काम, मानीव अभी हस्तांतरण अंतर्गत परिसरातील केलेल्या सोसायटीच्या 150 पेक्षा जास्त केलेल्या डीमड कन्व्हेन्स डीड करण्यास सोसायटीस मदत ,सोसायट्यांचा असलेला पाण्याचा प्रश्न, 500 पेक्षा जास्त सोसायटीमध्ये फेडरेशन मार्फत आदर्श उपविधीनुसार सोसायटी संचलित करण्याबाबत केलेले मार्गदर्शन, अनेक सोसायटीमध्ये असलेल्या ओपन पार्किंगचा विषय सोडवण्यासाठी बांधकाम व्यावसायिकांवर दबाव आणून भोसरी विधानसभेचे आमदार महेश लांडगे यांच्या माध्यमातून या बांधकाम व्यवसायिकांना पोडियम पार्किंग ही व्यवस्था करून देण्यात आली. सोसायटी धारकांच्या समस्या सोडविण्यासाठी नागरिकांचा संवाद या कार्यक्रमाचे आयोजन. कायदेविषयक अडचणी सोडविण्यासाठी पोलीस प्रशासनासोबत नागरिकांचा संवाद कार्यक्रमाचे आयोजन. कर न भरणाऱ्यांना सोडून संपूर्ण सोसायटीचा पाणीपुरवठा बंद करण्याच्या मोहीमेला केलेला विरोध , कोविडच्या काळात सोसायटी सभासदांना केलेली मदत, 50000 पेक्षा जास्त सोसायटी सदस्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माध्यमातून सर्व सोसायट्यांमधे कोविड लसीकरण शिबिरे घेऊन लसीकरणासाठी मदत, आदीसह विविध कामांचा आढावा मांडला.

“ पिंपरी चिंचवड शहराच्या लोकसंख्येपैकी 75 टक्के लोकसंख्या ही आज सोसायट्यांमध्ये राहते. त्यामुळे सर्व सोसायटीधारकांनी एकत्र येऊन आपले सर्व प्रश्न सोडवण्यासाठी आणि सर्व सोसायट्या आदर्श उपविधीनुसार चालवण्यासाठी फेडरेशन मार्फत भविष्यात काम केले जाईल. पिंपरी चिंचवड शहराच्या विकासामध्ये सर्व सोसायटी धारकांचे योगदान असेल. त्यासाठी सर्वांनी एकत्र मिळून प्रशासनावर दबाव गट आणून सर्व काम करून घेण्यासाठी पुढाकार घेतला जाईल.

**- संजीवन सांगळे, अध्यक्ष चिखली-मोशी -पिंपरी चिंचवड हाऊसिंग सोसायटी फेडरेशन**

---

# शहरातील माती, धान्य दिल्लीला पाठविणार!

## अतिरिक्त आयुक्त विजय खोराटे : महापालिकेचा अमृत कलश यात्रा उपक्रम

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**अमृत कलश यात्रा उपक्रमांतर्गत शहरातील विविध भागातून आणलेली माती आणि घराघरांतून जमा केलेले धान्य एकत्रितपणे महापालिकेच्या अमृत कलशात जमा करण्यात आले आहे. हा कलश मुंबई मार्गे दिल्लीस पाठविण्यात येणार असल्याची माहिती पिंपरी-चिंचवड महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली.**




पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने माझी माती, माझा देश उपक्रमांतर्गत अमृत कलश यात्रा उपक्रम व खमरी मो सिक्किम नौदल अधिकारी यांच्या रॅलीचा स्वागत समारंभ तसेच देशभक्तीपर गीतांच्या कार्यक्रमांचे आयोजन भक्ती शक्ती चौक, निगडी येथे करण्यात आले होते. या वेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना खोराटे बोलत होते.

या वेळी अतिरिक्त आयुक्त उल्हास जगताप, उपायुक्त रविकिरण घोडके, मिनीनाथ दंडवते, माजी उपमहापौर शैलजा मोरे, मुख्य सुरक्षा अधिकारी मेजर उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, खमरी मो सिक्किम नौदल अधिकारी कॅप्टन एम सत्यनारायण मूर्ती, आपत्ती व्यवस्थापन प्रमुख ओमप्रकाश बहिवाल, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक आदीसह महापालिका कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि पंचप्रण शपथेचे वाचन जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर आभार उप आयुक्त रविकिरण घोडके यांनी मानले.

### सैन्य भरती विषयक मार्गदर्शन...

कार्यक्रमाच्या सुरुवातीस छत्रपती शिवाजी महाराज आणि संतश्रेष्ठ तुकाराम महाराज यांच्या पुतळ्यास मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले. यानंतर सामुहिक पंचप्राण शपथ घेण्यात आली आणि 8 क्षेत्रीय कार्यालयातून आणलेले अमृत कलश अतिरिक्त आयुक्त खोराटे आणि जगताप यांचेकडे सुपूर्द करण्यात आले. या वेळी उपस्थित विद्यार्थ्यांच्या सैन्य भरती विषयक प्रश्नांबाबत कमांडर सुनिल शिंदे आणि सब लेफ्टनंट नेत्रा दामले यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमात देशभक्तीपर गीतांचा झंडा उंचा रहे हमारा हा कार्यक्रम सागर आठवाल आणि त्यांच्या सहका-यांनी सादर केला.




# आजूबाजूला समंजस माणसं नसती तर

**"तुम्ही सगळे एकमेकांत कुजबुजता. माझ्यापासून लपवताय काही तरी," उद्वेगाने द्वारकाआजींना हुंदका फुटला. पावसाळ्यात द्वारकाआजींच्या जुन्या खोलीचं छत गळू लागलं म्हणून त्यांची खोली बदलली. तेव्हापासून त्या चिडचिड्या, संशयी झाल्या होत्या; त्यांना साध्यासाध्या गोष्टी समजतच नव्हत्या.**

छताची डागडुजी करून आजींना जुन्या खोलीत नेलं आणि आजी पुन्हा हसऱ्या झाल्या; त्यांची समजसुद्धा आधीच्यासारखी लख्ख झाली. आजी मुला-नातवंडा-पतवंडांत, भरल्या घरात राहत होत्या म्हणून ते सारं वेळच्या वेळी झालं. आजूबाजूला समंजस माणसं नसती तर गैरसमज, आक्रस्ताळेपणा होऊन आजी नैराश्याच्या, बुद्धिमांद्याच्या गर्तेत बुडाल्या असत्या. पण अलीकडे बरेचसे आई-वडील कुटुंबापासून, मुलांपासून दूरच राहतात. पंचाहत्तरीचे पंडितकाका आणि मेधाताई मुंबईकर. मुलगा प्रद्योत कामानिमित्त दिल्लीत. एकुलत्या एक असलेल्या मेधाताईंचे शंभरीचे वडील नागेशराव पुण्यात. जागा बदलली की ते सैरभैर होतील म्हणून त्यांना पुण्यातच ठेवायचं ठरलं होतं.



काका-ताई आपला घरखर्च, बँकेची, टॅक्सची कामं स्वत:च करत. कित्येकदा मुलाचीही गुंतवणुकीची कामं ते करत. गरज लागली तर नातवंडांना सांभाळायला दिल्लीत पोहोचत. नागेश-आजोबांची देखभाल आणि बँकेची-टॅक्सची, गुंतवणुकीची-जमीनजुमल्याची कामं करायचं भाग्यही काका-ताईंनाच लाभलं होतं. 'सॅन्डविच' पिढीच्या त्या अतिकर्तृत्ववान प्रतिनिधींना चाँदबिबीसारखा अनेक आघाड्यांवर म्हातारपणाशी लढा द्यावा लागतो. त्यापायी अनेक गोष्टींचं भान बाळगावं लागतं. पंडितकाकांचा प्रद्योत गुणी मुलगा आहे. तो सीसीटीव्हीवरून मुंबई-पुण्याच्या दोन्ही घरांवर पाळत ठेवतो. आई-बाबा थकल्याचं जाणवलं तर डॉक्टरांच्याही कानावर घालतो आणि पंधरवड्यासाठी पानवलकरकाकूंकडून डबाही मागवतो. महिन्या-दोन महिन्यांतून त्याची दोन्ही घरांत एक फेरी असते. त्या वेळी तो कटाक्षाने तिथली काही कामं करतो.

पंचाहत्तरीनंतर ५० टक्के लोकांना कमी ऐकू येतं. त्यांच्या कानांच्या दोषांवर योग्य उपचार करणं; श्रवणयंत्र वापरायला त्यांना योग्य मदत-मार्गदर्शन करणं गरजेचं असतं. ते मिळालं; ऐकू चांगलं आलं की त्यांना फोनवरून अनेक कामं करता येतात; मुलाबाळांशी संभाषण होतं; एकटेपणा टळतो; गरजेला मदत मागता येते. रस्त्यावरून चालताना मागून येणाऱ्या गाडीचा आवाज ऐकू येतो; जीव वाचतो. पंचाहत्तरीनंतरच्या सुमारे ९० टक्के लोकांत मोतीबिंदू, काचबिंदू, नेत्रपटलाचे आजार वगैरेंमुळे दृष्टिदोष असतो आणि सात टक्के लोकांना बहुतांशी दिसत नाही. मग संगणक-मोबाइलवरून सहज होणारी कित्येक कामं शक्य होतात. बहुतेक दृष्टिदोषांवर वैद्यकीय इलाज आहेत. ते वेळीच झाले तरच व्यवहार सुरळीत चालू राहतात. बुद्धीला धार काढायचं काम ज्ञानेंद्रियं करतात. उतारवयात त्यांची साथसोबत सुटली तर नैराश्य घेरतं; बुद्धिमांद्यही येतं. वैद्यकीय मदतीने बहिरेपणावर, दृष्टिदोषांवर मात केली की बँकेची कामं आणि वाणसामानाचे हिशेबही अधिक चांगले जमतात, असं सर्वेक्षणांत दिसलं आहे. दृष्टिदोषामुळे पडझड वाढते; पडझड टाळायला घरात लख्ख उजेड आणि चालण्याच्या मार्गात आधाराला भक्कम दांड्या असाव्यात. गुळगुळीत संगमरवरी जमीन; मुडपत्या कडांचे गालिचे; चक्री जिने; अंधारे, वळणदार पॅसेजेस; सैल चपला; पायात घोटाळणारी साडी; आडवं जाणारं मांजर वगैरे लोळवणाऱ्या गनिमांचा वेळीच बंदोबस्त करावा लागतो. शिवाय त्या वयात कधी हृदय अनियमित होतं; तर कधी रक्तातल्या पाण्याचं आणि क्षारांचं संतुलन बिघडतं; पटकन उठून उभं राहिलं की रक्तदाब कोसळतो; कधी पायांतली ताकद जाते; सांधे डुगडुगतात, आखडतात; तळपायातून कळ येते; तोल सावरणं जमत नाही.. पडझडीने फ्रॅक्चर होतं; मेंदूला मार लागतो; प्रकृतीची घसरगुंडी सुरू होते. शिवाय ती नैराश्याची, बुद्धिमांद्याची नांदीही असू शकते. एकदा मेधाताईंचं पोट बिघडलं म्हणून डॉक्टरांनी गोळ्या दिल्या.

## संपादकीय »

### चिनी खेळण्यांना शह

***गेल्या काही वर्षांपासून खेळणी उद्योगांवर चीनची एकाधिकारशाही दिसून आली. सुमारे 80 टक्के बाजार चीनकडे राहिलेला आहे.***

साहजिकच चीनची ही मक्तेदारी मोडून काढणे मोठे आव्हान होते. परंतु, भारत सरकारच्या एका आवाहनाने चित्र बदलून गेले. केंद्र आणि राज्य सरकारच्या समन्वयातून देशात खेळणी उद्योगाला गती आली आहे. एकेकाळी भारत चीनकडून 20 हजार कोटींच्या खेळणी आयात करत होता; पण आज भारताचा खेळण्यांचा देशांतर्गत बाजार हा 124.73 अब्ज रुपये झाला आहे. इच्छाशक्ती असेल तर बरेच काही साध्य करता येऊ शकते. याचे जिवंत उदाहरण म्हणजे देशातील खेळणी उद्योग. काल-परवाचीच गोष्ट, जेव्हा भारत 20 हजार कोटी मूल्यांची खेळणी एकट्या चीनकडून आयात करत होता. कोरोनानंतर मात्र जगाच्या दृष्टिकोनात बदल झाला आणि असंख्य देश चीन आणि त्याच्या धोरणांकडे संशयाच्या नजरेने पाहू लागले. भारत सरकारनेहीदेखील हा विषय गांभीर्याने घेतला आणि सरकारचे आवाहन आणि सकारात्मक धोरणांचा परिणाम म्हणजे देशात खेळणी उद्योगाने वेग धरला आहे.

**भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी चार वर्षांपूर्वी झालेला महाविकास आघाडीचा प्रयोग आणि त्यापाठोपाठ आलेली करोना लाट राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मांड ठोकून बसलेल्या राजकीय सत्ताधीशांच्या उतरंडीचा काळ ठरला. प्रशासकीय राजवटीच्या माध्यमातून त्यांची सूत्रे नगरविकास खात्याकडे आली आणि त्या खात्याच्या माध्यमातून शिंदेंकडे. गेल्या दीड वर्षांपासून सुरू असलेल्या 'शिंदे राजवटी'ची पायाभरणी याच काळात झाली.**

# 'शिंदे राजवटी'ची पायाभरणी

साधारणपणे नगरविकास विभागाची सूत्रे मुख्यमंत्री स्वत:कडे ठेवतात, असा प्रघात आहे. देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री असताना नगरविकास आणि गृह अशी दोन्ही खाती स्वत:कडे ठेवली होती. उद्धव ठाकरे यांनी मात्र हे महत्त्वाचे खाते शिंदे यांच्याकडे सोपवून राज्यभरातील संपूर्ण शहरी प्रशासनाचा आणि एका अर्थी राजकीय व्यवस्थेचाही ताबा त्यांच्याकडे दिला.

याच करोनाकाळात नवी मुंबई, छत्रपती संभाजीनगर, कल्याण डोंबिवली, वसई-विरार यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकांचा कारभार प्रशासकाच्या हाती आला. एरवी ठाणे, डोंबिवली यांसारख्या शहरांच्या सत्तेपुरते मर्यादित राहिलेले शिंदे यांचे प्रभावक्षेत्र याच काळात संपूर्ण मुंबई महानगर प्रदेशात विस्तारू लागले. नवी मुंबई महापालिकेचे सत्तापद गणेश नाईक यांच्याकडून कधीही निसटले नव्हते.



वसई-विरारमध्येही ठाकुरांच्या दबदब्यापुढे कुणाचेही काही चालत नव्हते.

प्रशासकीय कालावधीत ही शहरे शिंदे यांच्या आधिपत्याखाली आली. मुंबईचा कारभार मातोश्रीने हाकायचा आणि मुंबईलगतची शहरे शिंदेंनी ताब्यात घ्यायची, अशी अलिखित व्यवस्था तेव्हा रूढ झाली. करोनाकाळात महानगर पट्ट्यातील शहरांमधील परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे प्रशासकीय सल्लागार अजोय मेहता यांनी येथील महापालिकांवर नव्या दमाच्या आयुक्तांची नियुक्ती करून घेतली. यापैकी काही नियुक्त्या या शिंदे यांना डावलून करण्यात आल्या होत्या. नवी मुंबईत अण्णासाहेब मिसाळ हे शिंदे यांच्या मर्जीतील मानले जात. त्यांना बदलून अभिजित बांगर यांची, तर ठाण्यात शिंदे यांना नको असलेले विजय सिंघल यांची नियुक्ती केली गेली. सिंघल यांच्या काळात तर अजोय मेहता थेट महापालिकेत बैठका घेऊ लागले.

हे शिंदे यांना अस्वस्थ करणारे होते. नगरविकास खाते असूनही शिंदे यांची नव्या सत्तेत फारशी पकड नाही अशा चर्चा अगदी कोविडकाळात सुरू झाल्या होत्या. मात्र ही परिस्थिती शिंदे यांनी मोठ्या राजकीय मुसद्दीपणाने हाताळली. बांगर यांची नियुक्ती होऊनही त्यांना २१ दिवस प्रतीक्षेत ठेवण्यात आले. शिंदे यांचा 'ना हरकत' दाखला आणल्यानंतरच त्यांना नवी मुंबई महापालिका मुख्यालयाची पायरी चढता आली.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

\- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# गर्दी मराठा समाजाला नवीन नाही!

## पंतप्रधानांनी फडणवीसांना समज द्यावी : जरांगे-पाटील

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।



**जालन्यातील आंरतवाली सराटी येथे झालेल्या मराठा समाजाच्या सभेत मनोज जरांगे-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केलं. पंतप्रधानांनी फडणवीसांना समज द्यावी. कारण, ते छोटे कार्यकर्ते अंगावर घालत आहेत, असं जरांगे-पाटील म्हणाले. याला भाजपा आमदार प्रसाद लाड यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.**

बोलवता धनी, तुमच्याकडून काम करून घेत आहे. तुम्ही देवेंद्र फडणवीसांवर टीका करत आहात, हे न शोभणारं कृत्य आहे, अशा शब्दांत लाड यांनी जरांगे-पाटलांना खडसावलं आहे. "मराठा आरक्षणावरून वेगळा रंग देण्याचा प्रयत्न होत आहे. मराठा समाजानं याचा विचार करण्याची गरज आहे. मराठा आंदोलनात आमच्यासारख्या कार्यकर्त्यांनी काम केलं. २०१८ साली देवेंद्र फडणवीसांनी मराठा समाजाला आरक्षण देण्याचं काम केलं. उच्च न्यायालयात आरक्षण टिकलं. पण, उद्धव ठाकरेंचं सरकार आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयात अडीच वर्षे पाठपुरावा करण्यात आला नाही. त्यामुळे आरक्षण रद्द झालं," असा आरोप प्रसाद लाड यांनी केला. "जरांगे-पाटील समाजासाठी काम करतात हे मान्य आहे. पण, ज्या पद्धतीनं तुम्हाला चालवलं जातंय, त्याचा निषेध करतो. जरांगे-पाटलांना ओबीसीतून आरक्षण हवं आहे. पण, आम्हाला देवेंद्र फडणवीसांनी दिलेलं मराठा आरक्षण १०० टक्के हवं आहे. गर्दी मराठा समाजाला नवीन नाही. ५० हून अधिक मोर्चे काढल्यानंतरही मराठा समाजानं गर्दी केली होती. या समाजाच्या भावना आहेत. ही कुठल्याही नेतृत्वाच्या मागची गर्दी नाही. तर मराठा आरक्षणासाठीची गर्दी आहे," असं प्रसाद लाड म्हणाले. "बोलवता धनी, तुमच्याकडून काम करून घेत आहे. तुम्ही देवेंद्र फडणवीसांवर टीका करत आहात, हे न शोभणारं कृत्य आहे. शरद पवार ४ वेळा, विलासराव देशमुख ९ वर्षे, पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण, शंकरराव चव्हाण आणि बाबासाहेब भोसले यांनी एवढे वर्षे मुख्यमंत्रीपद भूषावलं. पण, १९८३ साली अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणाची मागणी केली आणि स्वत:चा देह त्यागला. त्यानंतही मराठा मुख्यमंत्र्यांनी आरक्षण दिलं नाही," असं प्रसाद लाड यांनी सांगितलं. "५० वर्षांच्या इतिहासानंतर एका ब्राह्मण मुख्यमंत्र्यानं मराठा समाजाला आरक्षण दिलं. मराठ्यांना १०० टक्के आरक्षण हवं आहे. आम्हाला ओबीसी आणि एनटीमध्ये आरक्षण नको. शिंदे-फडणवीस आणि अजित पवारांच्या नेतृत्वात राज्य सरकार मराठ्यांना १०० टक्के आरक्षण देईल. मराठा समाजात फूट पाडण्याचं काम मोगलांनी केलं. ते काम काँग्रेस आणि शरद पवारांच्या नेतृत्वात जरांगे-पाटलांनी करू नये," असं आवाहन प्रसाद लाड यांनी केलं.

### मुख्यमंत्र्यांनी आरक्षण दिलं नाही

» जरांगे-पाटील समाजासाठी काम करतात हे मान्य आहे. पण, ज्या पद्धतीनं तुम्हाला चालवलं जातंय, त्याचा निषेध करतो. जरांगे-पाटलांना ओबीसीतून आरक्षण हवं आहे. पण, आम्हाला देवेंद्र फडणवीसांनी दिलेलं मराठा आरक्षण १०० टक्के हवं आहे. बोलवता धनी, तुमच्याकडून काम करून घेत आहे. तुम्ही देवेंद्र फडणवीसांवर टीका करत आहात, हे न शोभणारं कृत्य आहे. शरद पवार ४ वेळा, विलासराव देशमुख ९ वर्षे, पृथ्वीराज चव्हाण, अशोक चव्हाण, शंकरराव चव्हाण आणि बाबासाहेब भोसले यांनी एवढे वर्षे मुख्यमंत्रीपद भूषावलं. पण, १९८३ साली अण्णासाहेब पाटील यांनी मराठा आरक्षणाची मागणी केली आणि स्वत:चा देह त्यागला. त्यानंतही मराठा मुख्यमंत्र्यांनी आरक्षण दिलं नाही," असं प्रसाद लाड यांनी सांगितलं.

# चंद्रकांत पाटलांवर शाईफेक!

## भीम आर्मीची भाजपाविरोधात घोषणाबाजी

।सोलापूर।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सोलापूर जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री चंद्रकांत पाटील हे प्रथमच रविवारी रात्री सोलापुरात आले असता शासकीय विश्रामगृहात त्यांच्या अंगावर निळी शाई फेकण्यात आली. या घटनेमुळे तेथे गोंधळ उडाला. शासकीय नोकरभरतीचे खासगीकरण करण्याच्या धोरणाच्या निषेधार्थ एका संघटनेच्या कार्यकर्त्याने पाटील यांच्या अंगावर निळी शाई फेकल्याची माहिती समोर आली.**



### भाजपा मुर्दाबादच्या घोषणा

» पोलिसांनी सतर्कता बाळगून त्यास ताब्यात घेतले. मात्र त्यानंतर अजय मैंदर्गीकर नावाच्या तरूणाने पोलिस सुरक्षा पार करून पालकमंत्र्यांना भेटताना त्यांच्या अंगावर शाईफेक केली. त्याने काळा झेंडा दाखवत, भारतीय जनता पार्टी मुर्दाबादच्या घोषणा दिल्या आणि लगेचच शाईफेक केली. त्यामुळे गोंधळ झाला.

दरम्यान, पोलिसांनी भीमा इर्मी संघटनेचा म्हणविणा-या अजय मैंदर्गीकर नावाच्या तरूणाला जागेवर ताब्यात घेतले. या घटनेमुळे शासकीय विश्रामगृह परिसरात तणावाचे वातावरण पसरले होते. पालकमंत्री पाटील यांचे रात्री सात रस्त्यावरील शासकीय विश्रामगृहात आगमन झाले. त्यावेळी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. गेल्या महिन्यात याच शासकीय विश्रामगृहात तत्कालीन पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांना धनगर आरक्षण कृती समितीचा समन्वयक यांच्या अंगावर शेखर बंगाळे याने धनगर आरक्षण प्रश्नावर लक्ष वेधत निवेदन देताना त्यांच्या डोक्यावर भंडारा उधळला होता.

शासकीय विश्रामगृहात येणा-या प्रत्येक मंत्र्याच्या भेटीप्रसंगी आंदोलनाच्या रूपाने कोणतेही आक्षेपार्ह प्रकार घडू नयेत म्हणून पोलिस सतर्क आहेत. या पार्श्वभूमीवर चंद्रकांत पाटील यांच्या आगमनाप्रसंगी विश्रामगृहात येणा-या प्रत्येकाची पोलीस कसून तपासणी करीत होते. यापूर्वी विखे-पाटील यांच्यावर भंडारा उधळलेल्या शेखर बंगाळे हा सुध्दा चंद्रकांत पाटील यांना निवेदन देण्यासाठी आला होता.

# सदावर्तेंनी आमचा नाद करू नये : नरेंद्र पाटील

।सोलापूर।

प्रतिनिधी : महाईन्यूज

भाजपा नेते, माजी आमदार नरेंद्र पाटील यांनी वकील गुणरत्न सदावर्ते यांच्यासही मंत्री छगन भुजबळ यांच्यावर टीका केली आहे. सदावर्तेची अक्कल आम्हाला माहिती आहे. सदावर्तेंनी आमचा नाद करू, असा इशारा देत भुजबळांनी कधी मराठ्यांना मदत केली? हे आजपर्यंत दिसलं नाही, असा हल्लाबोल नरेंद्र पाटलांनी केला आहे. ते तुळजापूरमध्ये तुळजाभवानीच्या दर्शनानंतर प्रसारमाध्यमांशी बोलत होते. "वकील गुणरत्न सदावर्ते यांनी माझ्या अटकेची मागणी केली. मला अटक करणं सोपे आहे काय. मराठ्यांच्या विरोधात जाऊन त्यांना अंगावर घेऊन नका. पंतप्रधानांनी याबाबत फडणवीसांना समज दिली पाहिजे," असं विधान मराठा आंदोलक मनोज जरांगे-पाटील यांनी केलं होतं. यावर नरेंद्र पाटलांनी प्रतिक्रिया दिली. "सदावर्तेची अक्कल आम्हाला माहिती आहे. सदावर्तेंनी आमचा नाद करू नये. सदावर्तेमुळे बाकीच्यांची नावं जोडली जातात. सदावर्ते स्वतंत्र व्यक्तिमत्व आहेत. देवेंद्र फडणवीसांचा सदावर्तेशी काहीही संबंध नाही," असं नरेंद्र पाटलांनी सांगितलं. "देवेंद्र फडणवीसांनी मराठा समाजाला आरक्षण दिलं. यापूर्वीच्या मराठा समाजाच्या मुख्यमंत्र्यांनी आरक्षण का दिलं नाही? फडणवीसांनी आरक्षणाबाबत कुठेही टोलवा-टोलवी केली नाही. सदावर्ते आणि फडणवीसांची गोळाबेरीज करणं अयोग्य आहे," असं नरेंद्र पाटील म्हणाले.

# दिल्लीत भूकंपाचे जोरदार धक्के!


## » रिश्टर स्केलवर तीव्रता 3.1, केंद्रबिंदू फरीदाबादमध्ये

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रविवारी दुपारी 4 वाजून 8 मिनिटाला दिल्लीत भूकंपाचे जोरदार धक्के जाणवले. त्याची तीव्रता 3.1 रिश्टर असल्याचे सांगण्यात येत आहे. हरियाणातील फरिदाबाद येथे भूकंपाचा केंद्रबिंदू होता. दिल्लीत दोन आठवड्यांत तिसऱ्यांदा भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. यापूर्वी 3 ऑक्टोबर रोजी दिल्ली-एनसीआरसह उत्तर भारतात अनेक ठिकाणी भूकंपाचे धक्के जाणवले होते. 2 ऑक्टोबरलाही दिल्ली-हरियाणामध्ये भूकंपाचे धक्के जाणवले होते.**

दोन आठवड्यांपूर्वी, पृथ्वी दिवसातून दोनदा हादरली. 3 ऑक्टोबर रोजी दिल्ली-एनसीआर, उत्तराखंड, उत्तर प्रदेश, हरियाणा, राजस्थान आणि मध्य प्रदेशच्या काही भागात दुपारी 2.25 आणि 2.53 वाजता भूकंपाचे धक्के जाणवले. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता 4.6 इतकी होती. त्याचे केंद्र नेपाळच्या बझांग जिल्ह्यात होते. त्याच दिवशी नेपाळमध्ये एका तासात चार भूकंप झाले. 4.6 रिश्टर स्केलचा पहिला भूकंप पश्चिम नेपाळमध्ये 10 किलोमीटर खोलीवर दुपारी 2:25 वाजता झाला, त्यानंतर दुपारी 2:51 वाजता 6.2 रिश्टर स्केलचा भूकंप झाला, असे नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी (NCS) च्या अधिकाऱ्याने सांगितले. 3.6 आणि 3.1 रिश्टर स्केलचे आणखी दोन भूकंप दुपारी 3:06 आणि 3:19 वाजता झाले. भूकंपामुळे नेपाळमधील बझांगमध्ये अनेक कच्चा घरे कोसळली होती. उत्तर प्रदेशातील लखनौ, कानपूर, आग्रा, नोएडा, मेरठ, मुरादाबाद, गाझियाबाद, अयोध्या, अलीगढ, हापूर, अमरोहा, मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर, राजस्थानमधील जयपूर, अलवर येथे भूकंपाचे धक्के जाणवले. आपल्या पृथ्वीचा पृष्ठभाग प्रामुख्याने 7 मोठ्या आणि अनेक लहान टेक्टोनिक प्लेट्सपासून बनलेला आहे. या प्लेट्स सतत तरंगत राहतात आणि कधीकधी एकमेकांवर आदळतात. अनेक वेळा टक्कर झाल्यामुळे प्लेट्सचे कोपरे वाकतात आणि जेव्हा जास्त दाब येतो तेव्हा या प्लेट्स तुटू लागतात. अशा स्थितीत खालून बाहेर पडणारी ऊर्जा बाहेर पडण्याचा मार्ग शोधते आणि या गडबडीनंतर भूकंप होतो.



तीव्रतेच्या दृष्टीने आतापर्यंतचा सर्वात धोकादायक भूकंप 22 मे 1960 रोजी चिलीमध्ये झाला होता. रिश्टर स्केलवर त्याची तीव्रता ९.५ इतकी होती. यामुळे आलेल्या त्सुनामीने दक्षिण चिली, हवाई बेट, जपान, फिलीपिन्स, पूर्व न्यूझीलंड, दक्षिण-पूर्व ऑस्ट्रेलियासह अनेक देशांमध्ये भयंकर विध्वंस घडवून आणला. यामध्ये 1655 लोकांचा मृत्यू झाला, तर 3000 लोक जखमी झाले. सर्वात प्राणघातक भूकंप 1556 मध्ये चीनमध्ये झाला होता, ज्यामध्ये 8.30 लाख लोकांचा मृत्यू झाला होता.

### नेपाळमध्ये एका तासात चार भूकंप

» नेपाळमध्ये एका तासात चार भूकंप झाले. 4.6 रिश्टर स्केलचा पहिला भूकंप पश्चिम नेपाळमध्ये 10 किलोमीटर खोलीवर दुपारी 2:25 वाजता झाला, त्यानंतर दुपारी 2:51 वाजता 6.2 रिश्टर स्केलचा भूकंप झाला, असे नॅशनल सेंटर फॉर सिस्मॉलॉजी (NCS) च्या अधिकाऱ्याने सांगितले. 3.6 आणि 3.1 रिश्टर स्केलचे आणखी दोन भूकंप दुपारी 3:06 आणि 3:19 वाजता झाले. भूकंपामुळे नेपाळमधील बझांगमध्ये अनेक कच्चा घरे कोसळली होती. उत्तर प्रदेशातील लखनौ, कानपूर, आग्रा, नोएडा, मेरठ, मुरादाबाद, गाझियाबाद, अयोध्या, अलीगढ, हापूर, अमरोहा, मध्य प्रदेशातील ग्वाल्हेर, राजस्थानमधील जयपूर, अलवर येथे भूकंपाचे धक्के जाणवले.

# NASAने चांद्रयान-3चे तंत्रज्ञान मागवले!


## » आम्ही सर्वोत्तम रॉकेट बनवत आहोत : सोमनाथ

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर चांद्रयान-3 चे सॉफ्ट लँडिंग करून भारताने इतिहास रचला आहे. अमेरिकन अंतराळ संस्था NASAनेही भारताच्या यशाची कबुली दिली आहे. इस्रोचे प्रमुख एस. सोमनाथ म्हणाले की, नासाच्या शास्त्रज्ञांनी भारताकडून तंत्रज्ञान मागवले आहे. जेव्हा आम्ही चांद्रयान-3 विकसित केले. तेव्हा आम्ही नासा-जेपीएल (जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी) मधील शास्त्रज्ञांना बोलावले. या शास्त्रज्ञांनी जगातील अनेक रॉकेट आणि अनेक अवघड मोहिमा राबवल्या आहेत.**

नासा-जेपीएलचे 5-6 लोक इस्रोच्या मुख्यालयात आले होते. 23 ऑगस्ट रोजी चांद्रयान-3 चंद्राच्या पृष्ठभागावर सॉफ्ट लँडिंग कसे करेल हे आम्ही त्यांना समजावून सांगितले. आम्ही त्यांना आमची रचना समजावून सांगितली. आमच्या अभियंत्यांनी ते कसे बनवले ते देखील सांगितले. या सर्व गोष्टी ऐकून ते फक्त नो कॉमेंट्स असे म्हटले, म्हणजेच सर्व काही चांगले होणार असा त्यांचा म्हणण्याचा अर्थ होता. रामेश्वरम येथील डॉ. एपीजे अब्दुल कलाम फाउंडेशनच्या एका कार्यक्रमात सोमनाथ यांनी रविवारी (15 ऑक्टोबर) या गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले- भारत एक शक्तिशाली देश आहे. आमचे ज्ञान आणि बुद्धिमत्ता पातळी जगातील सर्वोत्तम देशांपैकी एक आहे. आजचा काळ कसा बदलत आहे हे तुम्हाला (विद्यार्थ्यांना) समजून घ्यायचे आहे, असेही इस्रोचे प्रमुख म्हणाले. आज आम्ही सर्वोत्तम उपकरणे, सर्वोत्तम उपकरणे आणि सर्वोत्तम रॉकेट बनवत आहोत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अवकाश क्षेत्र खुले केल्यामुळे हे सर्व घडत आहे. 'मी विद्यार्थ्यांना अंतराळ क्षेत्रात यावे आणि रॉकेट, उपग्रह बनवा आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात देशाला मजबूत करा, असे आवाहन करत आहे. केवळ इस्रोच नाही तर प्रत्येकजण अवकाश क्षेत्रात काहीतरी करू शकतो. आज भारतात 5 कंपन्या रॉकेट आणि उपग्रह बनवत आहेत. चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर अवकाशयान उतरवणारा भारत हा एकमेव देश आहे. यासह चंद्रावर उतरणारा अमेरिका, सोव्हिएत युनियन (रशिया), चीन नंतर भारत हा चौथा देश ठरला आहे.



### चांद्रयान-10 मध्ये एक महिला अंतराळवीर

» 23 ऑगस्ट रोजी चांद्रयान-3 चंद्राच्या पृष्ठभागावर सॉफ्ट लँडिंग कसे करेल हे आम्ही त्यांना समजावून सांगितले. आमच्या अभियंत्यांनी ते कसे बनवले ते देखील सांगितले. या सर्व गोष्टी ऐकून ते फक्त नो कॉमेंट्स असे म्हटले, म्हणजेच सर्व काही चांगले होणार असा त्यांचा म्हणण्याचा अर्थ होता. सोमनाथ म्हणाले की, तुमच्यापैकी कोणीही चांद्रयान-10 मध्ये बसू शकतो. चांद्रयान-10 मध्ये आपण भारतातून महिला अंतराळवीर चंद्रावर पाठवू शकतो.

# हवामान बदलाचे जगावर दुष्परिणाम

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

हवामान बदलाचे दुष्परिणाम जगावर दिसून येत आहेत. दररोज २० हजार मुलांना शाळा सोडावी लागते. युनिसेफने शुक्रवारी जारी केलेल्या अहवालात ही माहिती दिली आहे. अहवालात म्हटले आहे की 2016 ते 2021 दरम्यान 44 देशांमध्ये 4.31 कोटी मुले पूर, वादळ, दुष्काळ आणि जंगलातील आग या चार प्रकारच्या हवामान आपत्तींमुळे विस्थापित झाली आहेत. ग्लोबल वॉर्मिंगमुळे अशा आपत्ती पुन्हा पुन्हा येत आहेत. एकूण विस्थापनांपैकी ९५ टक्के (४१ दशलक्ष) पूर आणि वादळामुळे झाले.

युनिसेफने चेतावणी दिली आहे की, सध्याच्या हवामान बदलाच्या गतीने, 30 वर्षांत 100 दशलक्षाहून अधिक मुले आणि तरुण हवामानाशी संबंधित आपत्तींमुळे विस्थापित होतील. युनिसेफच्या स्थलांतर तज्ज्ञ व अहवालाच्या लेखकांपैकी एक लॉरा हॅली, म्हणाल्या, "वास्तव असे की भविष्यात अधिक मुले प्रभावित होतील, कारण हवामान बदलाचे परिणाम वाढतच आहेत," संख्या पीडितांच्या वयाशी जुळत नाही. जगातील प्रत्येक मुलाला शिक्षण देण्यासाठी ४ कोटी ४० लाख शिक्षकांची गरज आहे. अहवालात असे दिसून आले आहे की दुष्काळामुळे १३ लाखांहून अधिक मुले त्यांच्याच देशात विस्थापित झाली आहेत. त्याच वेळी जंगलातील आगीमुळे सुमारे ८.१ लाख मुले विस्थापित झाली. कॅनडा, इस्रायल आणि अमेरिकेला जंगलातील आगीचा सर्वाधिक फटका बसला. चीन, भारत आणि फिलीपिन्स या देशांमध्ये २२.३ दशलक्ष मुले अंतर्गत विस्थापित आहेत. परंतु, मुलांच्या लोकसंख्येच्या आकारानुसार, डोमिनिका आणि वानुआतु सारख्या लहान बेट राष्ट्रांमध्ये राहणाऱ्या मुलांना वादळाचा सर्वाधिक फटका बसला. सोमालिया आणि दक्षिण सुदानमधील मुलांना पुराचा सर्वाधिक फटका बसला.

# नवरात्रौत्सवाचे आध्यात्मिक आणि धार्मिक महत्त्व!



## नवरात्रातील घट हे गर्भाचं प्रतीक...


दिव्य अशा नऊ रूपांची पूजा या नऊ दिवसांत करतात. स्त्रीला प्राप्त असलेली अद्भुत शक्ती म्हणजे ती गर्भ धारण करू शकते. बीज रूप असलेल्या गर्भास अन्न पाणी देऊन त्याचं पोषण करते. नवरात्रातील घट हे गर्भाचं प्रतीक आहे. सर्जनाचा हा उत्सव आहे. आदिशक्ती जगदंबा ही संपूर्ण विश्वामधली मातृ शक्ती, जननी, पालनकर्ती आहे. शरीरामध्ये वसलेल्या चक्रांवर तिची सत्ता आहे. नवरात्रीच्या नऊ दिवसांत तिची नऊ स्वरूपांत पूजा होते. प्रथम शैलपुत्री ही पर्वतकन्या असून ती वृषभावर आरूढ झालेली आहे. ही दिव्य स्वरूप असून तिच्या आराधनेमुळे सर्व रोगांचं हरण होतं. द्वितीय ब्रह्मचारिणी ही पार्वती आहे. ती श्वेतवस्त्रा असून हातात कमंडलू व जपमाळ धारण केली आहे. ही वैराग्याचं प्रतीक आहे. स्वाधिष्ठान चक्रावर हिची सत्ता आहे. माता चंद्रघंटा ही सुवर्ण वर्ण असून तिनं अर्धचंद्र धारण केला आहे. ती अष्टभुजा, शस्त्रधारिणी आहे.चतुर्थ रूप आहे माता कुष्मांडा. जिच्या स्मित हास्यापासून ब्रह्मांड उत्पन्न झालं आहे. ही पुनरुत्पादन आणि नवनिर्मितीची देवता आहे. पंचम रूप स्कंदमाता ही कार्तिकेय माता आहे. ही ज्ञानस्वरूप आहे. सिंहारूढ आहे. षष्ठ रूप माता कात्यायनी. ही मातृस्वरूप आहे. स्त्रीच्या ठायी असलेली संगोपन करण्याची क्षमता हिच्या पूजनानं प्राप्त होते. कालरात्री ही कालस्वरुपिणी असून, विश्रांतीचं प्रतीक आहे. साक्षात् काल हिच्या ठायी वास करतो. हे देवीचं सातवं स्वरूप आहे. उग्र रूप असलं तरीही शुभंकर आहे.अष्टम रूप म्हणजे महागौरी. गौरवर्ण, मुक्त केशा अशी ही माता ज्ञान आणि शांततेचं प्रतीक आहे. ही सौम्य रूपा आहे. आईचं नववं रूप म्हणजे सिद्धीदात्री. हिच्या पूजनानं साधकाला अष्ट सिद्धी प्राप्त होतात. तेज आणि सात्विक वृत्तीची जोपासना होते. ही कमलासना आहे. सौम्य रूप आहे. नवरात्रीमध्ये ब्रह्मांड शक्ती ही जागृत अवस्थेत असते. या काळात स्त्रियांनी केलेली व्रत पूजा ही अतिशय फलदायी ठरते, असं म्हणतात. तसंच या दिवसात देवीला नवविध रंगांची फुलं, वस्त्रं, आभूषणं आदी अर्पण केली जातात. आठवड्यातील प्रत्येक वाराप्रमाणे परिधान केलेली वस्त्रं नवग्रहांच्या शुभ लहरी जागृत करतात, असं मानलं जातं. चंद्राचा रंग शुभ्र, मंगळाचा रक्त वर्ण, बुधाचा हरित, गुरूचा पिवळा, शुक्राचा गुलाबी तर शनीचा राखाडी असे रंग परिधान करावे, असं सांगतात. महाराष्ट्रात साडेतीन शक्तीपीठं आहेत.

## आपली संस्कृती ही मातृपूजन करणारी संस्कृती

महाराष्ट्राची कुलदेवता तुळजा भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची श्री रेणुका माता आणि वणीची श्री सप्तशृंगी. हा स्त्री शक्तीचा जागर करण्याचा काल आहे .शुंभ-निशुंभ, रक्तबीज, महिषासुर आदी राक्षसांना मारून आदिमाया विश्रांती घेते. या काळात जगदंबेची उपासना लोक विविध प्रकारे करतात. घटस्थापना, अखंड दीप, माला बंधन, नऊ दिवस उपवास, तसेच श्री सप्तशती पठण, नवचंडी हवन बळी, देवीचा गोंधळ, जागरण इत्यादी प्रथा-परंपरा दिसून येतात. या नऊ दिवसात कुमारिका पूजनाचं विशेष महत्त्व आहे. महानवमीला या उत्सवाचं पारणं होतं. दसऱ्याला माता सिंहारूढ होऊन सीमोल्लंघन करते आणि या उत्सवाचा समारोप होतो. काया वाचा मने शुद्ध राहून हे नऊ दिवस अंबेचा जागर करावा. मनातील सात्विक भाव जागृत करावे आणि शरीरशुद्धी करावी. या काळात सर्वसामान्य स्त्रीच्या ठायी सुद्धा एक प्रकारचं तेज निर्माण होतं. आपली संस्कृती ही मातृपूजन करणारी आहे, स्त्रीला सन्मान देणारी आहे. स्त्रीनंसुद्धा स्वतःचं अस्तित्व, सत्व जपून दुष्ट शक्तींचा नाश करावा, हेच प्रथांचं सार मानता येईल. आई जगदंबा तिच्या सर्व भक्तांना आशीर्वचन देऊन सुख समृद्धी, तेज आणि अन्यायाशी लढण्याची शक्ती प्रदान करो, हीच तिच्या चरणी प्रार्थना. आई जगदंबेचा उदो उदो...

इतके दिवस नवरात्रीचे वेध लागलेल्या स्त्रीवर्गातच नव्हे, तर सगळ्यांमध्येच उत्साह आणि चैतन्य खेळत असताना काय आहे नवरात्रीचं आध्यात्मिक आणि धार्मिक दृष्टीने महत्त्व...पितृपक्ष संपत येतो. वातावरण किंचित तापू लागतं. हवेमध्ये अजुनही थोडा थोडा पावसाळी ओलेपणा शिल्लक असतो. शरद ऋतूची चाहुल लागते. कधीतरी उत्तररात्री उशिरा आकाशाकडे नजर टाकली तर चांदणं दिसतं. खूप सुंदर दिवस असतात ते अणि रात्री त्याहून अधिक देखण्या. मग येतो अश्विन. अश्विन शुद्ध प्रतिपदा- घटस्थापना. आपल्याकडे खूप महत्त्व असलेलं शारदीय नवरात्र. ईश तत्त्व हे स्त्री रुपात अत्यंत मोहक, रम्य वाटतं. ही देवी अयोनी संभवा आहे, भक्त वत्सला आहे, मातृरूपिणी आहे. तिच्या सौंदर्याचं वर्णन करायला शब्द अपुरे आहेत. पण ती शस्त्रास्त्र धारण करणारीही आहे. दुष्टांचं निर्दालन करणारी आहे. शक्तीची पूजा अनादी काळापासून चालत आली आहे. जेव्हा असूर भयंकर माजले, तेव्हा ब्रह्मा, विष्णु, महेश यांच्या एकत्रित शक्तीपासून दुर्गा जन्मली. तिनं महिषासूर राक्षसाला मारून महिषासुरमर्दिनी हे नाव धारण केलं.





# अफगाणिस्तानसमोर इंग्लंडचे लोटांगण!

## अफगाणिस्तानचा 69 धावांनी खळबळजनक विजय

नवी दिल्ली । । वृत्तसंस्था

**राजधानी दिल्लीत आज अफगाणिस्तानने इंग्लंडविरुद्ध ऐतिहासिक विजयाची नोंद केली. इंग्लंड आणि अफगाणिस्तान यांच्यातील दोलायमान होत असलेल्या सामन्यात माजी विश्वविजेत्यांना चारीमुंड्या चीत करत अफगाणी खेळाडूंनी ६९ धावांनी रोमहर्षक विजय नोंदवला. विश्वचषक २०२३मधील हा पहिला धक्कादायक निकाल आहे. अफगाणिस्तानचा वर्ल्डकप स्पर्धेतला हा केवळ दुसराच विजय आहे. २०१५ वर्ल्डकप स्पर्धेत त्यांनी स्कॉटलंडला नमवलं होतं. इंग्लंडला वर्ल्डकप स्पर्धेत आतापर्यंत बांगलादेश विरुद्ध दोनवेळा आयर्लंड, झिम्बाब्वे आणि आता अफगाणिस्तानविरुद्ध पराभव पत्करावा लागला आहे.**




एकदिवसीय विश्वचषकाच्या १३व्या सामन्यात अफगाणिस्तानने इंग्लंडचा ६९ धावांनी पराभव करत अफलातून विजय नोंदवला. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानचा संघ ४९.५ षटकांत सर्वबाद २८४ धावांवर आटोपला. इंग्लंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे लक्ष्य होते, परंतु त्यांचा संपूर्ण संघ ४०.३ षटकांत २१५ धावांत सर्वबाद झाला. अफगाणिस्तानने १३व्या विश्वचषकात अनपेक्षितपणे इंग्लंडवर विजय मिळवत क्रिकेट विश्वात सर्वांनाच धक्का दिला. त्यांनी दिल्लीतील अरुण जेटली स्टेडियमवर गतविजेत्या इंग्लंडचा पराभव करून मोठा विजय संपादन केला. अफगाणिस्तान संघाने हा सामना ६९ धावांनी जिंकला. २०१५च्या विश्वचषकानंतर स्पर्धेतील त्यांचा हा पहिलाच विजय आहे. त्याचबरोबर इंग्लंडला १२ वर्षात दुसऱ्यांदा भारतीय भूमीवर दुसरा मोठा झटका बसला आहे. २०११च्या विश्वचषकात आयर्लंडने बंगळुरूमध्ये त्यांचा आश्चर्यकारक पराभव करून एकच खळबळ निर्माण केली होती. अफगाणिस्तानने विश्वचषक स्पर्धेत प्रथमच कसोटी खेळणाऱ्या देशाचा पराभव केला आहे. यापूर्वी त्याने २०१५ मध्ये स्कॉटलंडचा पराभव केला होता. इंग्लंडने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. अफगाणिस्तानचा संघ ४९.५ षटकांत सर्वबाद २८४ धावांवर आटोपला. इंग्लंडसमोर विजयासाठी २८५ धावांचे लक्ष्य होते, परंतु त्यांचा संपूर्ण संघ ४०.३ षटकांत २१५ धावांत सर्वबाद

### हॅरी ब्रूकच्या सर्वाधिक धावा

अफगाणिस्तानच्या फिरकी गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. अनुभवी रशीद खान आणि मुजीब उर रहमान यांनी प्रत्येकी तीन बळी घेतले. त्याचवेळी ऑफस्पिनर मोहम्मद नबीने दोन विकेट्स आपल्या नावावर केल्या. रशीद, मुजीब आणि नबी यांनी मिळून इंग्लंडचे कंबरडे मोडले. इंग्लंडकडून हॅरी ब्रूकने सर्वाधिक ६६ धावा केल्या. तो वगळता एकाही फलंदाजाला मोठी खेळी खेळता आली नाही. डेव्हिड मलानने ३२, आदिल रशीदने २० मार्क वुडने १८, रीस टोपलीने नाबाद १५ आणि जो रूटने ११ धावा केल्या.

झाला. अफगाणिस्तानच्या फिरकी गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली. अनुभवी राशिद खान आणि मुजीब उर रहमान यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतल्या. त्याचवेळी ऑफस्पिनर मोहम्मद नबीने दोन विकेट्स आपल्या नावावर केल्या. राशिद, मुजीब आणि नबी यांनी मिळून इंग्लंडचे कंबरडे मोडले. फजलहक फारुकी आणि नवीन-उल-हक यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. राशिद खानने इंग्लंडच्या डावातील १०वी विकेट घेतली. त्याने ४१व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर मार्क वुडला क्लीन बोल्ड केले. वुडने २२ चेंडूत १८ धावा केल्या. रीस टॉपली १५ धावा करून नाबाद राहिला. इंग्लंडकडून हॅरी ब्रूकने सर्वाधिक ६६ धावा केल्या. तो वगळता एकाही फलंदाजाला मोठी खेळी खेळता आली नाही. डेव्हिड मलानने ३२, आदिल राशिदने २०, मार्क वुडने १८, रीस टॉपलीने नाबाद १५ आणि जो रूटने ११ धावा केल्या. लियाम लिव्हिंगस्टोन आणि सॅम करन यांनी प्रत्येकी १० धावा केल्या. कर्णधार जोस बटलर आणि ख्रिस वोक्स यांनी प्रत्येकी ९ धावा केल्या. सलामीवीर जॉनी बेअरस्टो २ धावा करून बाद झाला.

# बुमराहला टाळायचे असेल तर निवृत्ती!

## ॲरॉन फिंचने केले जसप्रीत बुमराहचे कौतुक

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**जसप्रीत बुमराहने एकदिवसीय विश्वचषक २०२३मध्ये भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामन्यात शानदार गोलंदाजी केली. त्याने दोन महत्वाचे गडी बाद केले. पाकिस्तान संघाला १९१ धावांत रोखण्यात त्याचे मोठे योगदान आहे. या सामन्यानंतर ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार ॲरॉन फिंचला बुमराहपासून वाचण्याचा अजब पर्याय दिला. त्याला ऑस्ट्रेलिया संघाची आतापर्यंतची कामगिरीवर त्याने संताप देखील व्यक्त केला. तो म्हणाला, जर बुमराहचे चेंडू खेळता येत नसतील तर माझ्याप्रमाणेच निवृत्त व्हा.**




बुमराह सध्याच्या सर्वोत्तम गोलंदाजांपैकी एक आहे. त्याच्याकडे विविध प्रकारचे चेंडू टाकण्याची हातोटी आहे. कदाचित तो सध्याच्या काळातील सर्वोत्कृष्ट गोलंदाज आहे. तो आपल्या लाईन आणि लेन्थने सर्वोत्तम फलंदाजांना त्रास देऊन त्यांच्या नाकीनाऊ आणत आहे. बुमराहने अनेक विक्रम मोडले आहेत आणि विरोधी संघांच्या मनात भीती देखील निर्माण केली.

अनेक माजी आणि सध्याच्या खेळाडूंनी जसप्रीत बुमराहचे कौतुक केले आहे. त्याचवेळी काहींनी त्याच्या असामान्य गोलंदाजीवर टीका करण्याचा प्रयत्न केला आहे. बरेच विश्लेषण आणि सर्वकाही असूनही बुमराह यशस्वी ठरला आहे. तो आज जगातील सर्वोत्तम गोलंदाज आहे यात आश्चर्य नाही. मैदानावरील वाईट अडचणीच्या काळातही बुमराह प्रभाव टाकण्यात यशस्वी होतो, याचेच कौतुक फिंचने केले. बुमराहने हळूहळू स्वतःला एक महान गोलंदाज बनवले आहे आणि त्याची तुलना नेहमीच महान गोलंदाजांशी केली जाते. मात्र, आजपर्यंत इतर कोणत्याही गोलंदाजाला त्याच्या इतक्या कौशल्याच्या बाबतीत मागे टाकता आलेले नाही. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार ॲरॉन फिंचने पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात बुमराहचे कौतुक केले.

"बुमराह फक्त उजव्या हाताच्या फलंदाजांना चेंडू स्विंग करतो असे नाही तर तो डावखुऱ्या फलंदाजांसाठी देखील धोकादायक आहे," असे फिंच म्हणाला. तो पुढे म्हणाला, "बुमराहने हळूहळू चेंडूही फलंदाजापासून दूर नेण्यास सुरुवात केली आहे.जेव्हा बुमराहने पहिल्यांदा सुरुवात केली तेव्हा तो प्रामुख्याने उजव्या हाताच्या फलंदाजासाठी इनस्विंगर होता. तो त्यांना एका सरळ रेषेत गोलंदाजी करायचा. मग, एका मालिकेत, त्याने नॉन-स्टॉप आउटस्विंग गोलंदाजी करण्यास सुरुवात केली.

# ऑस्ट्रेलियाची विजयाची प्रतीक्षा संपणार?

नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत विजयाच्या शोधात असलेले ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका हे संघ सोमवारी लखनऊ येथे आमनेसामने येणार आहेत. दोन्ही संघांनी सुरुवातीचे दोन सामने गमावले असून त्यांचा विजयी लय मिळवण्याचा प्रयत्न असेल. विशेषतः ऑस्ट्रेलियाचा संघ आपली सर्वोत्तम कामगिरी करतो का, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

पहिल्या दोन सामन्यांत ऑस्ट्रेलियाला अनुक्रमे भारत आणि दक्षिण आफ्रिका, तर श्रीलंकेला दक्षिण आफ्रिका आणि पाकिस्तान या संघांकडून पराभव पत्करावा लागला. या स्पर्धेत श्रीलंकेच्या संघाकडून फारशा अपेक्षा बाळगल्या जात नसल्या, तरी ऑस्ट्रेलियाला जेतेपदासाठी प्रबळ दावेदार मानले जात आहे. ऑस्ट्रेलियन संघाने एकदिवसीय विश्वचषक स्पर्धामध्ये वर्चस्व गाजवले आहे. ऑस्ट्रेलियाने सर्वाधिक पाच वेळा ही स्पर्धा जिंकली आहे. मात्र यंदाच्या स्पर्धेतील त्यांची आतापर्यंतची कामगिरी निराशाजनक ठरली आहे. ऑस्ट्रेलियाची निव्वळ धावगती -१.८४६ अशी आहे. त्यामुळे श्रीलंकेविरुद्ध मोठा विजय मिळवण्याचा ऑस्ट्रेलियाचा प्रयत्न असेल. ऑस्ट्रेलियाने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तीनही विभागांत निराशा केली आहे. दोन सामन्यांत मिळून त्यांनी सहा झेल सोडले आहेत. फलंदाजीत झटपट गडी गमावल्याने ऑस्ट्रेलियन संघ दोनही सामन्यांत अडचणीत सापडला, तर गोलंदाजांना भारताविरुद्धची सुरुवातीची षटके सोडता लय सापडलेली नाही. त्यामुळे ऑस्ट्रेलियाला सर्वच विभागांत आपली कामगिरी उंचवावी लागणार आहे.